अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १२-७-२००६.

श्री./ श्रीमती.......................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक १७-७-२००६ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १६-१०-२००६.

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा शुक्रवार दिनांक २०-१०-२००६ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सोमवार दिनांक १७-७-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--*--

१. दुखवटयाचा प्रस्ताव

२. निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्था, वडगांव गुप्ता, जि.अहमदनगर यांचे " बांधा,वापरा हस्तांतरीत करा " (BOT) या तत्वानुसार सुलभ शौचालय बांधणे बाबतचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

३. सन २००५-२००६ मध्ये महानगरपालिकेतील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातुन मुलभूत सोई सुविधा पुरविणे बाबतची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव.

४. बाराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केलेल्या केंद्रीय अनुदानातुन विकास कामे करणे बाबतची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव.

५. सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात राज्यातील महानगरपालिकांना रस्ते दुरूस्ती, बांधणीसाठी " सर्वसाधारण रस्ता अनुदानातुन " अनुदान वितरीत झाले बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव.

६. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक १२-७-२००६

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

कृपया टिप्पणी मागे पहा...

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सोमवार दिनांक १७-७-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणां-या

खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

--*--

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | दुखवटयाचा प्रस्ताव | टिप्पणी नाही. |
| २ | निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्था, वडगांव गुप्ता, जि.अहमदनगर यांचे "बांधा,वापरा हस्तांतरीत करा " (BOT) या तत्वानुसार सुलभ शौचालय बांधणे बाबतचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ३ | सन २००५-२००६ मध्ये महानगरपालिकेतील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातुन मुलभूत सोई सुविधा पुरविणे बाबतची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ४ | बाराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केलेल्या केंद्रीय अनुदानातुन विकास कामे करणे बाबतची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ५ | सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात राज्यातील महानगरपालिकांना रस्ते दुरूस्ती, बांधणीसाठी " सर्वसाधारण रस्ता अनुदानातुन " अनुदान वितरीत झाले बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक : १२-७-२००६.
अहमदनगर.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दि.१७-७-२००६.

..............................................................

प्रस्तावाचा विषय - निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्था, वडगांव गुप्ता, जि.अहमदनगर यांचे "बांधा,वापरा हस्तांतरीत करा " (BOT) या तत्वानुसार सुलभ शौचालय बांधणे बाबतचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त संदर्भांकीत विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्था, वडगाव गुप्ता, जिल्हा अहमदनगर यांनी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील १) अहमदनगर रेल्वे स्टेशन समोरील शाला क्र ४ समोरील मोकळ्या जागेत २) मा. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील पराग बिल्डींग जवळ ३) बालीकाश्रम शाळेसमोर, सातभाईमळा ४) नेप्ती जुना नाका, कल्यान रोड ५) कोठी मार्केट यार्ड रोड या ठिकाणी त्यांचे खर्चाने महानगरपालिकेच्या जागेवर " बांधा वापरा व हस्तांतरीत करा " ( BOT ) या तत्वावर सुलभ शौचालयाचा वापर करणारे व्यक्तीकडुन अत्यल्प शुल्क आकारुन त्याची देखभाल व साफसफाई संस्थेची राहील या इतर शर्तीसह शौचालय बांधुन चालविणे करीता उपरोक्त ठिकाणी महानगरपालिकेची जागा मिळणे बाबत मागणी केली आहे.

सदर संस्थेच्या मागणी नुसार उपरोक्त ठिकाणी शौचालय बांधणे करीता जागा देता येईल किंवा कसे या बाबत मा. नगररचनाकार यांचेकडे अभिप्राय मागीतला असता त्यांनी संदर्भिय पत्र क्र २ नुसार म. न. पा शाळा क्र ४ चे कंपाऊंड लगत व शिवपवन मंगल कार्यालयासमोरील जुना नेप्ती नाका जवळील म. न. पा चे जागेत बांधणे योग्य होईल असा अभिप्राय दिला आहे.

कोठी मार्केट यार्ड रोड या ठिकाणी जुने अक्वा प्रायव्हि टाईप १० सीटचे शौचालय असुन सदरचे शौचालय २५ वर्षापेक्षा जुने असुन अत्यंत नादुरुस्त आहे.सदर अर्जदार यांनी स्वःखर्चाने १० सीटचे शौचालय ३० वर्ष करारान " पैसे द्या व वापरा " या तत्वावर चालविणेची मागणी केली आहे.

उपरोक्त तीनही ठिकाणी " पैसे द्या व वापरा " या तत्वावर शौचालय बांधल्यास जवळपासचे नागरीकांची तसेच नागरीकांची तसेच तीनही ठिकाणी प्रवाशांची आवक जावक असल्याने त्यांचीही शौचालयाची सोय होईल . तसेच ज्या नागरीकांना स्वतःची शौचालये नाहीत असे नागरीक उघड्यावर बसतात त्यांचेसाठीही सदरची शौचालये उपयोगी होतील व उघड्यावर शौचालय बसण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

तरी सोबतच्या अटीसह उपरोक्त संस्थेशी रीतसर करारनामा करुन म. न. पा चे उपरोक्त ठिकाणी BOT तत्वावर प्रत्येक ठीकाणी १२X३८ ची जागा उपलब्ध करुन देवुन शुलभ शौचालये बांधणेस हरकत नाही.

अटी शर्ती खालील प्रमाणे.

१. प्रस्तावित शौचालयाचे बांधकामाचे जागेची मालकी अहमदनगर महानगरपालिकेची राहील.
२. प्रस्तावित शौचालयाचे बांधकाम संस्थेने स्वतःहाचे खर्चाने करावयाचे असुन इतर सोईसुध्दा उदा. पाणी ,लाईट इ. व्यवस्थाही स्वखर्चाने करावयाची आहे.
३. शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्याची मालकी अहमदनगर महानगरपालिकेची राहील.मात्र शौचालयाची दैनंदिन साफसाफाई व देखभाल संबंधित संस्थेने करावयाची आहे.

४. बांधकाम पुर्ण झालेनंतर पुढील ३० वर्ष संबंधित संस्थेच्या ताब्यात राहील .त्यानंतर सदरची शौचालयावर संपुर्णपणे ताबा महानगरपालिकेचा राहील.
५. शौचालयाचे दैनंदिन साफसफाई साठी व देखभालीसाठी २४ तास केअर टेकरची नेमणुक संबंधित संस्थेने स्वखर्चाने करावयाची आहे.
६. सदरची शौचालये सर्व नागरीकांना २४ तास खुले असतील.
७. शौचालये वापरास रुपये १/- प्रतीव्यक्ती व बाथरुम वापरास रुपये २/- प्रति व्यक्ती या प्रमाणे रक्कम संबंधित संस्थेस आकारता येतील.
८. शौचालयाचे साफसफाई पहाण्याचे अधिकार महानगरपालिकेचे स्वच्छता विषयक अधिकार व त्यांचे सुचनांची दखल घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.
९. कराराचा भंग केल्यास सदरची शौचालये आपले ताब्यात घेणेचा अधिकार अहमदनगर महानगरपालिकेस राहील.

तरी निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्था, वडगांव गुप्ता यांना महानगरपालिकेच्या उपरोक्त तीन ठिकाणी सुलभ शौचालय BOT तत्वावर बांधुन " पैसे द्या व वापरा " या तत्वावर ३० वर्ष चालविणेस देणे या करीता मा. सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.तरी अहवाल आदेशार्थ सविनय सादर.

यावर एन.बी.मगर यांचा अभिप्राय की, शाखा अभियंता यांचे अहवालाप्रमाणे निर्मल ग्राम विकास संस्था वडगाव गुप्ता , अ.नगर यांना अहवालाप्रमाणे मनपा शाळा नं.४ कंपौंड जवळ २. जुना नेप्ती नाका जवळ ३. कोठीजवळ (मार्केट यार्ड रोड) जुने संडास पाडुन नविन बांधणे या तीन ठिकाणी बांधा वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर योग्य करारनामा करून सुलभ शौचालयाचे बांधकाम करण्यास परवानगी देणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर.

यावर एन.डी.कुलकर्णी शहर अभियंता यांचा अभिप्राय की, याप्रमाणे प्रस्ताव महासभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे. सविनय सादर.

यावर मा. उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे अभिप्रायाप्रमाणे प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावाशी सहमत अर्जदार संस्था प्रस्तावित तीन ठिकाणी स्व निधीतुन स्वच्छतागृहाचे बांधकाम करून पे आणि युज तत्वावर विहित अटी शर्तीवर लिजवर देणेस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट श्री.मगर अभियंता,श्री.कुलकर्णी,सिटी इंजिनिअर, मा.उपायुक्त कर व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा :**

१) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - आजच्या सभेमध्ये ४ ते ५ कोटी विकासाची कामे सभेपुढे घेतल्याबद्दल मी अभिनंदन करतो. माझ्या भागातील विकासाच्या कामाबाबत आजपर्यंत ५ ते ६ पत्रे दिलेली आहेत. गेल्या अडीच वर्षात माझ्या भागात कामे झालेली नाहीत. परंतु यापुढे अशाप्रकारे दुजाभाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच मागासवर्गीय विशेष कल्याण निधीमधून ५% राखीव निधीतून माझ्या भागामध्ये विकास कामाची कार्यवाही करावी. याबाबत स्थायी समितीमध्ये एस्टीमेट ठेवलेले आहे.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून जे काम करणार आहेत त्याबाबत त्यांचेकडून माहिती घ्यावी. या संस्थेच्या संचालकांनी स्वतः माहिती दिली. याबाबत मा.सदस्यांना विश्वासात घेउनच कामे करण्यात यावीत. यावर मा.महापौर यांनी सांगितले

की, मा.सदस्यांना विश्वासात घेउनच जागा ठरविल्या जातील. तेव्हा सदरचा विषय मंजूर करावा असे सांगितले.

मा.श्री.सुनिल त्रिपाठी - सदर संस्था याकामी कर्ज काढून कामे करणार आहे. त्यांचे पैसे वसुल झाले नाही तर काय? याबाबत प्रायोगिक तत्वावर त्यांना काम देणे योग्य होईल.

३) मा.श्री.दिपक सुळ - संस्थेने सुचविलेल्या ठिकाणी कामे घेउन त्यानंतर मा.त्रिपाठी यांचे वॉर्डातील कामे ५% राखीव निधीतून करण्यात येतील.

४) मा.श्री.अशोक कानडे - सेवाभावी संस्थांना नफयावर कामे करता येत नाहीत मग या संस्थेस काय फायदा होणार आहे असा प्रश्न संस्थेच्या संचालकांना विचारला. त्यावर सदर संस्थेच्या संचालकांनी अशा प्रकारे कामे करता येतात असे सांगितले. तसेच मा.आयुक्त यांनी याबाबत कायदेशीर अडचणी येणार नाहीत असे सांगितले. त्यानंतर श्री.कानडे यांनी सुचविले की, हद्दवाढीतील भागातही प्रामुख्याने ही कामे घ्यावीत. कारण हद्दवाढीतील नागरीक स्वतःचे शौचालय बांधू शकत नाही. त्यामुळे या योजनेतून शौचालय बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे हागणदारीमुक्त प्रभाग होउ शकेल. त्यावर श्री.एन.डी.कुलकर्णी, सिटी इंजिनिअर यांनी सांगितले की हद्दवाढीतील भागात ५% राखीव निधीतून नवीन प्रस्ताव घेण्यात येतील. यावर मा.उपमहापौर यांनी खुलासा केला की, हद्दवाढीतील भागातील नगरसेवकांची पत्रे घेउन त्यांचे भागात मागासवर्गीय कल्याण निधीमधून कामे घेण्यात येतील.

५) मा.श्री.कैलास गिरवले - सदर योजनेतून कामे घेताना रस्त्याचा विचार करण्यात यावा. तसा अभिप्राय देताना अतिक्रमणाबाबत विचार करावा व प्रत्यक्षात जागा असेल तरच योजनेचा विचार करावा.

६) मा.सौ.मंगला गुंदेचा - माझ्या भागामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह बांधणेबाबतचा प्राधान्याने विचार करावा. याबाबत यापूर्वीही मी कळविले होते. यावर मा.महापौर यांनी सांगितले की जागा उपलब्ध करुन यावर मार्ग काढू.

७) मा.सौ.गितांजली काळे - चर्चेमध्ये हस्तक्षेप करताना सांगितले की, पिंपळगांव तलाव येथे २ ते ३ कि.मी. शेती आहे. विरोधकांनी बदनामी चालविलेली आहे. खोटेनाटे कागदपत्र तयार करुन बदनामी चालविली आहे. मी एक जबाबदार सदस्या आहे. आपण स्वतः खात्री करुन याबाबत बदनामी थांबवावी. त्यावर मा.श्री.गिरवले यांनी सांगितले की, पिंपळगांव येथे ९ ते १० विहीरी आहेत. अनेक वर्षापासूनच्या आहेत. शेती व जनावरांसाठी पाणी वापरतात. भिल्ल लोकांनी विहीराचा गाळ काढला. तेव्हा आपले लोक काय करीत होते. चोरी होत होती त्यावेळेस रिपोर्ट का घेण्यात आले नाही. मी अनेक वेळा ही गोष्ट वरिष्ठांच्या नजरेस आणून दिली आहे. गरीब लोकांनी श्रमदानातून विहीराचा गाळ काढून पिण्यासाठी पाणी वापरले. तर कुठे बिघडले. मनपा टँकरवर ७-८ लाख खर्च करीत आहेच. शासन पिण्याच्या पाण्यावर कितीतरी कोटी खर्च करते. त्यांनी स्वतःच्या खर्चावर पाणी घेतले तर बिघडले कुठे. चौकशी समिती नेमून कर्मचा-यांवर कारवाई करावी.

पिंपळगांव तलावातील वाळु चोरी होत असताना दिसत नाही का? मी तेथे पाहणी केली असताना २० ते २५ गाडयांमधून वाळू चोरी होत होती. याबाबतचा कार्यालयीन अहवाल का दिला जात नाही.

तरी याबाबत उपरोक्त तक्रारदार यांना बरोबर घेवून सदर तक्रारीची पहाणी करावी. यावर मा.महापौर यांनी श्री.निकम, पा.पु.इंजिनिअर यांना खुलासा करणेस सुचविले असता त्यांनी सांगितले की, श्री.बडवे अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. यावर सिटी इंजिनिअर यांनी समक्ष पहाणी करुन चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

मा.आयुक्त यांनी वाळु चोरावर कारवाई झालेली आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी कारवाई करु शकतात. याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना लेखी कळविलेले आहे. तसेच महानगरपालिकेने याबाबत प्रयत्न केलेला आहे. शेतीसाठी काही परवाने दिलेले आहेत व त्याबाबत विचार करण्यात आलेला आहे. शेवटी मा.महापौर यांनी पाहणी करुन कार्यवाही होईल असे सांगितले.

**ठराव** : ऑफीस रिपोर्ट मंजूर.मात्र प्रस्तावात नमुद केलेल्या ठिकाणापैकी दोन ठिकाणी प्रायोगीक तत्वावर शौचालय बांधणेच्या कार्यवाही मान्यता देण्यात येत आहे.तसेच सदरच्या दोन शौचालयांचा नागरी सेवा देण्यासाठी होत असलेला उपयोग विचारात घेवून उर्वरीत शौचालय बांधणेचे कामाबाबत कार्यारंभ आदेश देण्यात यावे.

सुचक : मा.श्री.दिपक वसंतराव सुळ
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.१७-७-२००६.

प्रस्तावाचा विषय - सन २००५-२००६ मध्ये महानगरपालिकेतील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातुन मुलभूत सोई सुविधा पुरविणे बाबतची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव.

--*--

प्रस्तावाचा मजकूर - महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. - संकिर्ण - १००५ / ६४६ / प्र.क्र.- १९४ / ०५ / नवि - २४ , मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २९ मार्च २००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे रू.१,००,००,००० /- (रू.१ कोटी) इतके अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. सदर अनुदान मुलभुत सोई सुविधा पुरविणेसाठी शासनाने उपलब्ध करून दिलेले आहे. जिल्हाधिकारी , अहमदनगर यांना या अनुदानाच्या संदर्भात आहरण व वितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे शासनाने वितरीत केलेले अनुदान व तेवढाच स्वतःचा हिस्सा मिळुन एकुण रू.२.०० कोटी इतक्या रक्कमेची विकास कामे करणे शक्य आहे. यासाठी सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता म्हणजे सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर विकास कामे मा.पालकमंत्री यांची मान्यता घेवुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे आवश्यक आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील केडगाव, मुकूंदनगर तसेच सारसनगर उपनगरांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई पाहता सदर ठिकाणी पिण्याचे पाणी पुरवठा करणारी वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. या भागातील नागरिकांनी पाणी पुरवठा नियमित होण्यासाठी वेळोवेळी निवेदने , आंदोलन,रास्ता रोको व उपोषण आदी मार्गांचा अवलंब केलेला आहे. पाणी पुरवठयात सुधारणा करणेसाठी सन्माननीय लोकप्रतिनिधी तसेच नागकिांची आग्रहाची मागणी आहे. तसेच वितरण व्यवस्थेची तपासणी करता असे आढळुन आले की, केडगाव व इतरत्र व्हॉल्व्स वाजवीपेक्षा जास्त आहे. तसेच पाईप लाईन्स देखिल अत्यंत जुन्या झालेल्या असल्याने वेळोवेळी त्या फुटत असतात व पाणी पुरवठा खंडित होतो. तांत्रिक दृष्टया असे नमुद करावेसे वाटते की, व्हॉल्व्सची संख्या कमी करणे, नविन लाईन्स टाकणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून गळती कमी होवुन पाणी पुरवठा नियमित करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे मुकूंदनगर या उपनगरात देखिल वरीलप्रमाणेच परिस्थिती असल्यामुळे या ठिकाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे. स्वामी समर्थ नगर (सारसनगर ) या ठिकाणी पाण्याची टाकी बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने पुर्वीच मंजुर केलेला आहे. त्या पाण्याच्या टाकीपासुन देखील वितरण व्यवस्था करणे आवश्यक आहे. अन्य भागातील आवश्यकता व मागणी विचारात घेता सोबत दिल्याप्रमाणे इतरही कामे करणे आवश्यक आहे.

मा.ना.श्री.अजित पवार साहेब यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना दिनांक ५ एप्रिल २००६ रोजी पत्र पाठवुन एकुण १३ कामे विशेष अनुदानातुन घेणे बाबत आवश्यक कार्यवाही करण्यास सांगितले आहे. यातील कामांचे स्वरूप पाहता सर्व कामांची एकुण किंमत विशेष अनुदानापेक्षा जास्त होउ शकेल. यातील आवश्यक असणारी गटर्स, पिण्याच्या पाण्याची लाईन्स व विद्युतीकरणाची कामे हाती घेणे योग्य राहील असे वाटते.

साधक - बाधक विचार करून पिण्याची पाण्याची वितरण व्यवस्था सुधारणा, नविन लाईन्स टाकणे, गटर्स बांधणे, विद्युतीकरण व अत्यंत आवश्यक असणारी रस्त्यांची कामे यात सुचविणे योग्य राहील असे वाटते.

प्रस्तावित कामांची यादी खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

१. केडगाव अंतर्गत इंडस्ट्रियल इस्टेट ते बालाजी संपवेल पर्यंत २०० मि.मि.व्यासाची कास्ट आयर्न वितरिका टाकणे (अंदाजित किंमत रू.३८ लाख)

२. केडगाव अंतर्गत बालाजी संपवेल ते एकनाथनगर २०० मि.मि.व्यासाची कास्ट आयर्न वितरिका टाकणे (अंदाजित किंमत रू.३४ लाख)

३. मुकूंदनगर अंतर्गत मर्चंट बँक कॉलनी ते मारिया मस्जिद कास्ट आयर्नची वितरिका टाकणे (अंदाजित किंमत रू.१४ लाख)

४. मुकूंदनगर अंतर्गत गणपती मंदिर ते दरबार कॉलनी चौक ते दर्गा दायरा कास्ट आयर्न वितरिका टाकणे (अंदाजित किंमत रू.१७ लाख)

५. स्वामी समर्थ नगर ( सारसनगर पाण्याची टाकी ) ते व्हिडीओकॉन कंपनी नानाजी नगर ते सारसनगर मधुबन कॉलनी वितरिका टाकणे (अंदाजित किंमत रू.३० लाख)

६. प्रभाग क्रमांक १४ मधील जलालशहा बुखारी स्मशान भुमी अंतर्गत स्ट्रीट लाईनचे काम करणे. (अंदाजित किंमत रू.२५ लाख)

७. प्रभाग क्र.४ रामवाडी कौलारू झोपडपट्टी व गोकुळवाडी झोपडपट्टी येथे अंतर्गत स्ट्रीट लाईन्स पुरविणे (अंदाजित किंमत रू.५.०० लाख )

८. प्रभाग क्र.२ मधील नवलेनगर अंतर्गत कोमटे नाल्यापर्यंत पी.सी.सी.गटर बांधणे (अंदाजित किंमत रू.५.०० लाख)

९. प्रभाग क्र.४ मधील गुरूद्वारा ते फलटण पोलिस चौकी, बिस्मिल्ला खानावळ ते गवत बाजार झोपडपट्टी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे. ( अंदाजित किंमत रू.३.०० लाख)

१० प्रभाग क्र.१२ मधील सोनानगर अंतर्गत पी.सी.सी.गटर बांधणे (अंदाजित किंमत रू.४.०० लाख)

११. पाईप लाईन रस्त्यावरील मोरया सांस्कृतिक भवन ते आनंदबन कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण ( अंदाजित किंमत रू.५.०० लाख)

१२. यशवंत हौसिंग सोसायटी , नगर औरंगाबाद रस्ता अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणाचे नुतनीकरण करणे. ( अंदाजित किंमत रू.५.०० लाख)

१३. आनंदऋषीजी हॉस्पीटल ते पत्रकार वसाहत क्रमांक २ ते माणिक नगर रस्त्याचे डांबरीकरण करणे. ( अंदाजित किंमत रू.८.०० लाख)

१४. बुरूडगांव ते व्ही.आर.डी.ई . रस्त्याचे डांबरीकरण करणे ( अंदाजित किंमत रू.७.०० लाख)

वरीलप्रमाणे रू.२ कोटीची एकंदर १४ आवश्यक कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत. यामध्ये पिण्याचे पाणी पुरविण्याची नवीन लाईन्स वितरण व्यवस्था, गटर्स, विद्युतीकरण अशी आवश्यक कामेच सुचविण्यात आलेली आहेत.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध प्रभागांमधील सदर कामे माननीय सर्वसाधारण सभेसमोर प्रशासकीय मंजुरीसाठी तातडीच्या सभेमध्ये ठेवण्यासाठी सदर अहवाल पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर लेखापरिक्षक यांचा अहवाल की, शहर अभियंता यांचेकडील प्रस्ताव " अ "प्रमाणे (शासन निर्णय) दि.२९ मार्च २००६ अन्वये मान्यता देणेस हरकत नाही.

यावर श्री.सु.वि.देशमुख उपायुक्त सामान्य यांचा अभिप्राय की, शासन निर्णयातील अटी शर्तीनुसार कामे हाती घेण्यासाठी वरीलप्रमाणे प्रस्ताव शहर अभियंता यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मा.महसभेसमोर ठेवणेसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावाशी सहमत. प्रस्तावित कामांना प्राधान्याने मंजुरी देणेस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट लेखापरिक्षक,मा.उपायुक्त सामान्य व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा :** १) मा.श्री.कृ.द.जाधव - सदर विषय मंजुर करावा असे सांगितले.

२) मा.सौ.मनिषा भागानगरे - यांनी यादी देवून सांगितले की, विषय क्र.३ मधील प्रस्ताव क्र.५ समर्थनगर सारसनगर पाण्याची टाकी ते व्हीडीओकॉन कंपनी ते मधुबन कॉलनी पाईपलाईन टाकणेचा प्रस्ताव रद्द करण्यात येउन त्याऐवजी कोठी ते चाणक्य चौक ते हॉटेल यशपॅलेस चौक तसेच राउत मळा ते भिंगारनाल्या पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेत यावी असे सुचविले. तसेच सदयस्थितीत प्रस्ताव क्र.५ मधील विषय क्र.१४ देखील रद्द करावा. अशी सुचना मांडली व हा निधी उपरोक्त कामाकरीता वापरावा असे सांगितले.

३) मा.सौ.संध्या पवार - दिलेल्या यादीप्रमाणे दुरुस्त्या करण्यात याव्या.

४) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - सारसनगर समर्थनगर हा भाग वेगळा आहे. कोठी ते यश पॅलेस ड्रेनेज हा प्रश्न तातडीचा आहे.

५) मा.डॉ.सौ.योगिता सत्रे - सदरचा विकास कामाचा विषय चांगला आहे. त्यामध्ये प्रभाग क्र.११ मध्ये सांडपाण्यासाठी प्रेमदान चौक ते फुलारी पेट्रोल पंप ते सीना नदीपर्यंत बंद पाईपची गटार बांधण्यात यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव यांनी उपरोक्त ठराव सुचविलेल्या दुरुस्त्यासह मंजूर करण्यात यावा असे सांगितले.

**ठराव** : **(अ)** ऑफिस रिपोर्ट व साधक व बाधक झालेली चर्चा तसेच सौ.मनिषा प्रकाश भागानगरे यांच्या पत्रानुसार विषय क्रमांक ३ मधील प्रस्ताव क्रमांक ५ समर्थ नगर सारसनगर,पाण्याची टाकी ते व्हीडीओ कॉन कंपनी ते मधुबन कॉलनी वितरीका टाकणे हा प्रस्ताव रद्य करण्यात येवून त्याऐवजी कोठी ते चाणक्य चौक ते हॉटेल यश पॅलेस चौक तसेच राउत मळा ते भिंगार नाल्यापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे तसेंच ब्रॅच लाईन व तद्अनुषंगिक तांत्रिक कामे करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. या कामा करीता सदयस्थितीत फारसा आवश्यक नसलेला विषय क्र.३ मधील प्रस्ताव क्रमांक १४ देखील रद्य करण्यात यावा व त्याचा देखील निधी वरील मसुदयात सुचीत केलेल्या कामाकरीता वापरणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सौ.पवार संध्या बाळासाहेब,नगरसेविका यांनी त्यांचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे प्रभागातील विषय क्रमांक ३ मधील प्रस्ताव क्रमांक ११ हा देखील रद्य करण्यात येवून त्याऐवजी औरंगाबाद रोड ते दसरेनगर ते गुलाब नगर ते नित्यसेवा सोसायटी चौका दरम्यानचा रस्ता

डांबरीकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.सदरच्या कामाकरीता रद्द केलेल्या विषयाचा निधी वापरणे बाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी.

विषय क्रमांक ३ मधील प्रस्ताव क्रमांक ५,११ व १४ रद्द करण्यात यावा.उपरोक्त सुचविलेल्या दुरुस्तीसह वरील सुचना व दुरुस्ती यांचा समावेश करुन ऑफिस रिपोर्टास मंजुरी देण्यात येत आहे. खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

**(ब)** मा.सौ.योगिता रंजित सत्रे,सभापती,महिला व बाल कल्याण समिती यांनी सांडपाण्याची अडचण मांडुन सुचीत केलेनुसार " प्रेमदान चौक ते फुलारी पेट्रोल पंप ते सिना नदी पर्यन्त बंद पाईपची गटार बांधणे" बाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन सक्षम प्राधिकरणा पुढे निर्णयासाठी ठेवण्यांत यावा.

सुचक : मा.सौ.मनिषा प्रकाश भागानगरे,
अनुमोदक : मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार,

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दि.१७-७-२००६.

प्रस्तावाचा विषय - बाराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केलेल्या केंद्रीय अनुदानातुन विकास कामे करणे बाबतची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव.

प्रस्तावाचा मजकूर : नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांच्या दिनांक १५ एप्रील २००६ रोजीच्या पत्राप्रमाणे रुपये १,९५,९१,६१०/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.याबाबत प्रस्ताव मंजुर करणेसाठी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली असून नगरपरिषद प्रशासन संचालयामार्फत प्रस्ताव सादर करणे आहेत.त्यानंतरच निधीचे वाटप होणार आहे.

या निधीमध्ये खालीलप्रमाणे कामे अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहेत.

अ ) घनकचरा व्यवस्थापन -- प्राप्त निधीच्या एकुण ५६.५% निधी घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करणे बंधनकारक आहे.केंद्र शासनाने या प्रकारे मार्गदर्शक तत्वे नमुद केलेली आहेत.

ब ) शहर विकासासाठी उर्वरीत निधी खर्च करण्यासाठी स्वायत्त संस्थानी निर्णय घ्यावयाचे आहेत.यामध्ये प्रामुख्याने अग्निशामन व्यवस्था,पर्जन्यजल पुनःर्भरण विकास आराखडयातील आरक्षण विकसीत करणे किंवा शहराच्या गरजेप्रमाणे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे.

यासाठी संबंधीत नागरी संस्थानी ठराव करणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे रुपये १.९५ कोटी पैकी रुपये १.१० कोटी घनकचरा व्यवस्थापन व ०.८५ कोटी इतर विकास कामांसाठी खालीलप्रमाणे प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

१. घनकचरा व्यवस्थापन

| | |
|---|---|
| कॉम्पॅक्टर खरेदी करणे | -- रुपये ४० लाख |
| सुक्या व ओल्या कच-यासाठी कंटेनर खरेदी करणे | -- रुपये ४० लाख |
| कचरा डेपो विकसीत करणे | --- रुपये ३० लाख |

( जसे कम्पाउंड वॉल,अंतर्गत सुधारणा करणे )

२. शहर विकास

यामध्ये प्रामुख्याने पुल बांधणे व रस्त्यांची कामे सुचविण्यात येत आहेत.शहरातील सारसनगर या उपनगरासाठी जाण्यासाठी १ पुल असुन तो कमकुवत झालेला आहे. सारस ानगरमध्ये जाण्यासाठी एवढा एकमेवच पुल आहे त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने सदर काम

अत्यंत महत्वाचे आहे.त्याचप्रमाणे आयुर्वेद हॉस्पीटल व काटवन खंडोबा आगरकर मळा या रस्त्यांला सीना नदी छेदते.या ठिकाणी पावसाळयामध्ये रस्ता बंद पडतो व नागरीकांची मोठी गैरसोय होते.संजयनगर झोपडपटटी,काटवन खंडोबा,आगरकर मळा, व इतरही असणा-या नागरी वस्त्यांना सदरचा रस्ता अत्यंत सोयीचा आहे.त्याप्रमाणे सीना नदीवर पुल होणे अत्यंत आवश्यक आहे.त्याचप्रमाणे शहरातील महानगरपालिका तख्ती दरवाजा ते माणीक चौक हा महत्वाचा रस्ता असून सदयाची रस्त्यांची अवस्था पहाता सदर रस्त्यांचे काम होणे अत्यंत आवश्यक आहे.सदर विकासासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

अ ) सारसनगर येथे पुल बांधणे ( अंदाजीत किंमत रुपये २०.०० लाख )

ब ) आयुर्वे द हॉस्पीटल ते काटवन खंडोबा रस्त्यांवर सीना नदीवर पुल बांधणे (अंदाजीत किंमत रुपये ३०.०० लाख )

क ) वाडीयापार्क ते महानगरपालिका कार्यालय बेग पटांगण ,तुरुंग ,तख्ती दरवाजा ते माणिक चौक रस्त्यांवरील डांबरीकरणाचे नुतनीकरण करणे ( अंदाजीत किंमत रुपये २५.०० लाख )

याप्रमाणे एकुण रुपये १.९५ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी सादर करणे व पुढील आदेशार्थ .

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचेकडील प्रस्ताव '' अ '' प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचकडील प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य राहील.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावाशी सहमत.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट मुख्य लेखा परिक्षक,मा.उपायुक्त (कर ),व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयासाठी मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा :**

मा.श्री.कृ.द.जाधव - विषय क्र.४, मंजुर करण्यात यावा.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करणेत यावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव ,
अनुमोदक : मा.श्री.कि.आ.डागवाले,

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दि.१७-७-२००६.

प्रस्तावाचा विषय - सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात राज्यातील महानगरपालिकांना रस्ते दुरूस्ती, बांधणीसाठी " सर्वसाधारण रस्ता अनुदानातुन " अनुदान वितरीत झाले बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.खास सभेपुढे मंजुरीस्तव.

**<u>प्रस्तावाचा मजकुर</u>** : महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक - जीईएन - १०२००५/९५४/प्र.क्रं.४०/२००६/नवि-१६, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक २० फेब्रुवारी २००६ रोजीच्या निर्णयाप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेस ७१,७०,०००/- इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्यानंतर देखिल रुपये १७,९३,०००/- इतका निधी प्राप्त झालेला आहे. सदर शासन निर्णया प्रमाणे रस्ता अनुदानाचा विनियोग शहरातील मुख्य रस्त्यांच्या सुशोभिकरणासाठी करावयाचा आहे. सदर अनुदान वितरीत करण्यांसाठी जिल्हाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी म्हणुन घोषित करण्यांत आलेले आहे.

अहमदनगर शहरामधील गणपती विसर्जन तसेच मोहर्रम मार्ग महत्वाचे असुन सदर रस्त्यांचे नुतणीकरण व सुशोभिकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अहमदनगर शहरातील केडगांव, मुकुंदनगर नागापुर या उपनगरांमधील रस्त्यांचे दखिल मजबुतीकरण व नुतणीकरण करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे खालील प्रमाणे रस्ते सदर योजनेमधुन प्रस्तावित करण्यांत येत आहेत.

१) केडगांव येथील अंबिकानगर बस स्टॉप ते शाहुनगर रस्त्याचे मजबुतीकरण व नुतणीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.१२.०० लाख).

२) नगर मनमाड रस्ता ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते बोल्हेगांव रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.१२.०० लाख).

३) मुकुंदनगर एरिगेशन कार्यालय ते दरबार कॉलनी रस्त्याचे नुतणीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.८.०० लाख).

४) जिल्हाधिकारी कार्यालय हातमपुरा बुरुडगल्ली पंचपीरचावडी महानगरपालिका कार्यालय दोबोटीचिरा कोर्टगल्ली चौपाटी कारंजा ते दिल्ली दरवाजा रस्त्याचे नुतणीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.२५.०० लाख).

५) चौपाटी कारंजा चितळेरोड तेलिखुंट ते आडतेबाजार झेंडीगेट ते अशोका हॉटेल रस्त्याचे नुतणीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.२०.०० लाख).

६) ए.डी.सी.सी.बँक ते मार्केट यार्ड चौक रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.६.५० लाख).

७) महालक्ष्मी उद्यान ते भुतकरवाडी पंपिंग स्टेशन रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ( अंदाजित किंमत रु.६.०० लाख).

सदर कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदर प्रस्ताव मंजूरीसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे सुचित होईल असे वाटते.

यावर ऑडीटर यांचा शेरा की, शहर अभियंता यांचेकडील प्रस्तावा प्रमाणे मा.महानगरपालिका सभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा शेरा की, रस्ते अनुदानातून यावर्षी अनुदान मंजूर करतांना शहरातील महत्वाचे रस्ते घेण्याचे निर्देश दिलेले आहे. शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेले रस्ते अत्यंत महत्वाचे रस्ते असल्यामुळे मान्यतेसाठी प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.

**चर्चा :**

मा.श्री.कृ.द.जाधव - विषय क्र.५ मंजुर करण्यात यावा.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करणेत यावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव ,
अनुमोदक : मा.श्री.कि.आ.डागवाले,

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

विषय क्र.२ - चर्चा.

१) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - आजच्या सभेमध्ये ४ ते ५ कोटी विकासाची कामे सभेपुढे घेतल्याबद्दल मी अभिनंदन करतो. माझ्या भागातील विकासाच्या कामाबाबत आजपर्यंत ५ ते ६ पत्रे दिलेली आहेत. गेल्या अडीच वर्षात माझ्या भागात कामे झालेली नाहीत. परंतु यापुढे अशाप्रकारे दुजाभाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच मागासवर्गीय विशेष कल्याण निधीमधून ५% राखीव निधीतून माझ्या भागामध्ये विकास कामाची कार्यवाही करावी. याबाबत स्थायी समितीमध्ये एस्टीमेट ठेवलेले आहे.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - निर्मल ग्राम विकास सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून जे काम करणार आहेत त्याबाबत त्यांचेकडून माहिती घ्यावी. या संस्थेच्या संचालकांनी स्वतः माहिती दिली. याबाबत मा.सदस्यांना विश्वासात घेउनच कामे करण्यात यावीत. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, मा.सदस्यांना विश्वासात घेउनच जागा ठरविल्या जातील. तेव्हा सदरचा विषय मंजूर करावा असे सांगितले.

मा.श्री.सुनिल त्रिपाठी - सदर संस्था याकामी कर्ज काढून कामे करणार आहे. त्यांचे पैसे वसुल झाले नाही तर काय? याबाबत प्रायोगिक तत्वावर त्यांना काम देणे योग्य होईल.

३) मा.श्री.दिपक सुळ - संस्थेने सुचविलेल्या ठिकाणी कामे घेउन त्यानंतर मा.त्रिपाठी यांचे वॉर्डातील कामे ५% राखीव निधीतून करण्यात येतील.

४) मा.श्री.अशोक कानडे - सेवाभावी संस्थांना नफयावर कामे करता येत नाहीत मग या संस्थेस काय फायदा होणार आहे असा प्रश्न संस्थेच्या संचालकांना विचारला. त्यावर सदर संस्थेच्या संचालकांनी अशा प्रकारे कामे करता येतात असे सांगितले. तसेच मा.आयुक्त यांनी याबाबत कायदेशीर अडचणी येणार नाहीत असे सांगितले. त्यानंतर श्री.कानडे यांनी सुचविले की, हद्दवाढीतील भागातही प्रामुख्याने ही कामे घ्यावीत. कारण हद्दवाढीतील नागरीक स्वतःचे शौचालय बांधू शकत नाही. त्यामुळे या योजनेतून शौचालय बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे हागणदारीमुक्त प्रभाग होउ शकेल. त्यावर श्री.एन.डी.कुलकर्णी, सिटी इंजिनिअर यांनी सांगितले की हद्दवाढीतील भागात ५% राखीव निधीतून नवीन प्रस्ताव घेण्यात येतील. यावर मा.उपमहापौर यांनी खुलासा केला की, हद्दवाढीतील भागातील नगरसेवकांची पत्रे घेउन त्यांचे भागात मागासवर्गीय कल्याण निधीमधून कामे घेण्यात येतील.

५) मा.श्री.कैलास गिरवले - सदर योजनेतून कामे घेताना रस्त्याचा विचार करण्यात यावा. तसा अभिप्राय देताना अतिक्रमणाबाबत विचार करावा व प्रत्यक्षात जागा असेल तरच योजनेचा विचार करावा.

६) मा.सौ.मंगला गुंदेचा - माझ्या भागामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह बांधणेबाबतचा प्राधान्याने विचार करावा. याबाबत यापूर्वीही मी कळविले होते. यावर मा.महापौर यांनी सांगितले की जागा उपलब्ध करुन यावर मार्ग काढू.

७) मा.सौ.गितांजली काळे - चर्चेमध्ये हस्तक्षेप करताना सांगितले की, पिंपळगांव तलाव येथे २ ते ३ कि.मी. शेती आहे. विरोधकांनी बदनामी चालविलेली आहे. खोटेनाटे कागदपत्र तयार करुन बदनामी चालविली आहे. मी एक जबाबदार सदस्या आहे. आपण स्वतः खात्री करुन याबाबत बदनामी थांबवावी. त्यावर मा.श्री.गिरवले यांनी सांगितले की, पिंपळगांव येथे ९ ते १० विहीरी आहेत. अनेक वर्षापासूनच्या आहेत. शेती व जनावरांसाठी पाणी वापरतात. भिल्ल लोकांनी विहीराचा गाळ काढला. तेव्हा आपले लोक काय करीत होते. चोरी होत होती त्यावेळेस रिपोर्ट का घेण्यात आले नाही. मी अनेक वेळा ही गोष्ट वरिष्ठांच्या नजरेस आणून दिली आहे. गरीब लोकांनी श्रमदानातून विहीराचा गाळ काढून पिण्यासाठी पाणी वापरले. तर कुठे बिघडले. मनपा टँकरवर ७-८ लाख खर्च करीत आहेच. शासन पिण्याच्या पाण्यावर कितीतरी कोटी खर्च करते. त्यांनी

स्वतःच्या खर्चावर पाणी घेतले तर बिघडले कुठे. चौकशी समिती नेमून कर्मचा-यांवर कारवाई करावी.

पिंपळगांव तलावातील वाळु चोरी होत असताना दिसत नाही का? मी तेथे पाहणी केली असताना २० ते २५ गाडयांमधून वाळू चोरी होत होती. याबाबतचा कार्यालयीन अहवाल का दिला जात नाही.

तरी याबाबत उपरोक्त तक्रारदार यांना बरोबर घेवून सदर तक्रारीची पहाणी करावी. यावर मा.महापौर यांनी श्री.निकम, पा.पु.इंजिनिअर यांना खुलासा करणेस सुचविले असता त्यांनी सांगितले की, श्री.बडवे अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. यावर सिटी इंजिनिअर यांनी समक्ष पहाणी करुन चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

मा.आयुक्त यांनी वाळु चोरावर कारवाई झालेली आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी कारवाई करु शकतात. याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना लेखी कळविलेले आहे. तसेच महानगरपालिकेने याबाबत प्रयत्न केलेला आहे. शेतीसाठी काही परवाने दिलेले आहेत व त्याबाबत विचार करण्यात आलेला आहे. शेवटी मा.महापौर यांनी पाहणी करुन कार्यवाही होईल असे सांगितले.

विषय क्र.३ - चर्चा.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - सदर विषय मंजुर करावा असे सांगितले.

२) मा.सौ.मनिषा भागानगरे - यांनी यादी देवून सांगितले की, विषय क्र.३ मधील प्रस्ताव क्र.५ समर्थनगर सारसनगर पाण्याची टाकी ते व्हीडीओकॉन कंपनी ते मधुबन कॉलनी पाईपलाईन टाकणेचा प्रस्ताव रद्द करण्यात येउन त्याऐवजी कोठी ते चाणक्य चौक ते हॉटेल यशपॅलेस चौक तसेच राउत मळा ते भिंगारनाल्या पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेत यावी असे सुचविले. तसेच सदयस्थितीत प्रस्ताव क्र.५ मधील विषय क्र.१४ देखील रद्द करावा. अशी सुचना मांडली व हा निधी उपरोक्त कामाकरीता वापरावा असे सांगितले.

३) मा.सौ.संध्या पवार - दिलेल्या यादीप्रमाणे दुरुस्त्या करण्यात याव्या.

४) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - सारसनगर समर्थनगर हा भाग वेगळा आहे. कोठी ते यश पॅलेस ड्रेनेज हा प्रश्न तातडीचा आहे.

५) मा.डॉ.सौ.योगिता सत्रे - सदरचा विकास कामाचा विषय चांगला आहे. त्यामध्ये प्रभाग क्र.११ मध्ये सांडपाण्यासाठी प्रेमदान चौक ते फुलारी पेट्रोल पंप ते सीना नदीपर्यंत बंद पाईपची गटार बांधण्यात यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव यांनी उपरोक्त ठराव सुचविलेल्या दुरुस्त्यासह मंजूर करण्यात यावा असे सांगितले.

विषय क्र.४, ५, ६ - चर्चा.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - उर्वरीत विषय क्र.४, ५, ६ मंजुर करण्यात यावेत असे सुचवीले. त्यानंतर सर्व विषय मंजूर झाले.